04-07-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 7/3/2025 10:41 PM Page 1

CHANGE IN NAME

I **NATAL MARIA LOBO E FALEIRO** R/O H NO 303, WALKESHWAR VADDO, SIRCAIM, TIVIM, BARDEZ, GOA like to change my name from **NATAL MARIA FALEIRO** to **NATAL MARIA LOBO E FALEIRO**. Hereafter in all my dealing and documents I will be known by the name **NATAL MARIA LOBO E FALEIRO**.

CHANGE OF NAME

I, **Eugenio Mario Pereira**, son of late Menino Pereira , resident of H.No. 31, Muxer, Bandora, Ponda, North - Goa, 403401 declare that both my names **Eugenio Mario Menino Pereira** and **Eugenio Mario Pereira** belong to the same person. Henceforth in all my dealings and documents I will be known by the name **Eugenio Mario Pereira.**

OFFICE OF VILLAGE PANCHAYAT CALANGUTE
BARDEZ - GOA
VP/Cal/F-19/2025-26/ 1417
Dated : 03/07/25

NOTICE INVITING QUOTATION

Sealed Quotations are invited from eligible Dealers / Companies for the following:-

PURCHASE OF 58.5 KVA 3PH DG SET FOR PANCHAYAT GHAR

The interested eligible Dealers / Contractors / Companies should submit the application for the issue of Quotation form upto **15/07/2025 at 11:00 am** and the quotations will be opened on **17/07/2025 at 3:00 pm** at the V.P. Office.

You may contact this panchayat office for more details.

The Panchayat reserves the right to accept or reject any or all the quotations without assigning any reason thereof.

This quotation is issued as per the resolution no. IX J (157) dated 30/06/2025.

Sd/- Seal
(Shri. Joseph R. Sequeira) Sarpanch,
V. P. Calangute

OFFICE OF VILLAGE PANCHAYAT CALANGUTE
BARDEZ - GOA
VP/Cal/F-19/2025-26/ 1416
Dated : 03/07/25

NOTICE INVITING QUOTATION

Sealed Quotations are invited from eligible Dealers / Companies for the following:-

Purchase MRF TYRES 6, TYRES BEHIND BUTTON TYRES FOR GARBAGE VEHICLES SIZE 8.25/16

The interested eligible Dealers / Contractors / Companies should submit the application for the issue of Quotation form upto **15/07/2025 at 11:00 am** and the quotations will be opened on **17/07/2025 at 3:00 pm** at the V.P. Office.

You may contact this panchayat office for more details.

The Panchayat reserves the right to accept or reject any or all the quotations without assigning any reason thereof.

This quotation is issued as per the resolution no. IX J (95) dated 30/06/2025.

Sd/- Seal
(Shri. Joseph R. Sequeira) Sarpanch,
V. P. Calangute

IN THE COURT OF JOINT MAMLATDAR OF BARDEZ III AT MAPUSA, GOA

Case No. JM-III / MND / PUR / Anjuna / 11 / 2025

Bharati Vasanta Chodancar alias Vasudha Moru Sawant, R/o H. No. 78, Kater Bandir Waddo, Anjuna, Bardez, Goa .....Applicant
V/s
Mr. Jose Ferrao, R/o Near Busstand, Aldona, Bardez, Goa ....Opponents

PUBLIC NOTICE

To The Opponents

Whereas the above applicant has made an application dated 07.04.2025 in this Court under the Provision of Sub Section 1, Section 16 of Goa Daman and Diu Mundkar (Protection from Eviction) Act 1975 for the purchase of the dwelling house No. 78 situated under Sy. No. 390/2 of village Anjuna Taluka Bardez under the provision of the said Act.

And whereas the applicant by application dated 02.08.2025 informed that the notice issued to the opponent returned unserved with remarks "Incomplete Address" and that she does not know any other address of the opponent and it is therefore prayed for substitute service to the said opponent by way of publication in daily newspaper.

And whereas this Court is satisfied that this is a fit case for ordering such service.

Now therefore, notice is hereby given to you under Order V of Rule 20(1)A of the C.P.C. 1908 to appear before this Court either in person or by duly authorization on **06/08/2025** at **10.30 a.m.** to answer the claim.

Take notice that, in default of your appearance as aforesaid on the date and time mentioned above, the application will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of this Court on this 03rd day of July 2025.

Sd/- **Jenisa Pereira** Seal
Joint Mamlatdar Bardez III
Mapusa, Goa

OFFICE OF VILLAGE PANCHAYAT CALANGUTE
BARDEZ - GOA
VP/Cal/F-19/2025-26/ 1418
Dated : 03/07/25

NOTICE INVITING QUOTATION

Sealed Quotations are invited from eligible Dealers / Companies for the following:-

PURCHASE OF 20 NOS. OF ROUND TABLES AND 20 NOS. OF BANQUT TABLE COVER WITH FRILL ATTACHED 30X61X28.5 FOR THE PANCHAYAT CONFERENCE HALL.

The interested eligible Dealers / Contractors / Companies should submit the application for the issue of Quotation form upto **15/07/2025 at 11:00 am** and the quotations will be opened on **17/07/2025 at 3:00 pm** at the V.P. Office.

You may contact this panchayat office for more details.

The Panchayat reserves the right to accept or reject any or all the quotations without assigning any reason thereof.

This quotation is issued as per the resolution no. IX J (156) dated 30/06/2025.

Sd/- Seal
(Shri. Joseph R. Sequeira) Sarpanch,
V. P. Calangute

गोवा सरकार
जलस्रोत खाते
कार्यकारी अभियंता कार्यालय, काम विभाग–१, पर्वरी – गोवा.

निविदा सूचना क्र. ६–९/डब्ल्यूडी–१/ डब्ल्यूआरडी/ एएसडब्ल्यू/२५–२६/इ–१० **दि. ०२/०७/२०२५**

या विभागाने वरील संदर्भाची निविदा सूचना प्रसिद्ध केली आहे व त्यात भाग घेण्यासाठी ती https://eprocure.goa.gov.in या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आली आहे.
डीआय/एडीव्हीटी/७८२/२०२५

आयबीसी, २०१६ खाली ई–लिलाव विक्री सूचना
मे. यूजीएच व्हिंटेज हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटर प्रायव्हेट लिमिटेड (लिक्विडेशनमधील)
नोंदणीकृत कार्यालय : काकुलो एन्क्लेव्ह, सांतीनेज, पणजी, गोवा ४०३००१

आयबीसी, २०१६ चे कलम ३५(एफ) सह आयबीबीआय (लिक्विडेशन प्रोसेस) रेग्युलेशन्स, २०१६ ची अनुसूची १ व रेज ३२ खाली लिक्विडेटर द्वारा लिक्विडेशन इस्टेटचा भाग असलेल्या मे. यूजीएच व्हिंटेज हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटर प्रायव्हेट लिमिटेड च्या खालील मत्तांच्या विक्रीसाठी या ई–लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे बोली मागविल्या आहेत.

लिक्विडेशन रेग्युलेशन्सचे नियमन ३२(ए) ते (डी) खाली विकावयाच्या तपशीलावर मत्ता

संच : जमीन व बिल्डींग * : काकुलो एन्क्लेव्ह, सांतीनेज, पणजी, ताळगाव, तालुका : तिसवाडी, उपजिल्हा : इल्हास, जिल्हा : उत्तर गोवा, राज्य : गोवा, पीन :४०३००१ येथील ३,०४५.५ चौ.मी. बिल्ट अप क्षेत्रफळाचे बांधकाम आणि १७५० चौ.मी. क्षेत्रफळाची जमीन.
* टीप : ९६६.५२ चौ.मी. बिल्ट अप क्षेत्रफळ (बिल्डींगचा भाग) वर्ष २०१३ मध्ये प्रमोटर्स/संचालकांना हस्तांतरित केला आहे आणि लिक्विडेटरने आयबीसी, २०१६ च्या कलम ६६ खाली दुर्लक्ष्य (अव्हॉयडन्स) अर्ज मान. एनसीएलटी, मुंबई यांचेसमोर सादर केला आहे जो विक्रीसाठी विक्री करार/करार बाजूला ठेवण्यासाठी एनसीएलटी, मुंबई न्यायपीठ यांचेसमोर प्रलंबित आहे. संबंधित डिसक्लोजर्स ई–लिलाव माहितीप्रपत्रात दिले आहेत.

राखीव किंमत (रु.)	ईएमडी (रु.)	बोली वाढ रक्कम (रु.)
१०,१३,६५,३४६/–	१,०१,३६,५३५/–	१०,००,०००/–

ईएमडी जमा करण्याची अंतिम तारीख	०२.०८.२०२५
ई–लिलाव तारीख व वेळ	०४.०८.२०२५ (सकाळी १०.०० ते दुपारी १२.००)

१. इच्छुक बोलीदारांनी, **https://ibbi.baanknet.com** येथे उपलब्ध असलेल्या एनसीएलटी न्यायपीठ, मुंबई यांचेसमोर दाखल केलेल्या दुर्लक्ष्य अर्ज संबंधीचा तपशील आणि ऑनलाईन ई–लिलावाच्या तपशीलवार अटी व शर्ती, बोली प्रपत्रे, पात्रता निकष, बोलीदारांद्वारे घोषणापत्र, बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) गरज इ. साठी ई–लिलाव प्रक्रिया माहिती प्रपत्राचा संदर्भ घ्यावा.
२. प्रस्तावित बोलीदारांनी बांकनेट लिलाव प्लॅटफॉर्म **https://ibbi.baanknet.com** द्वारे दिवाळखोरी व बुडवेगिरी कोड च्या कलम २९ ए खाली पात्रतेच्या अंडरटेकिंग सह आवश्यक कागदपत्रे सादर करावीत.
३. प्रस्तावित बोलीदारांनी ०२.०८.२०२५ रोजी वा त्यापूर्वी बांकनेट लिलाव प्लॅटफॉर्म **https://ibbi.baanknet.com** द्वारे ईएमडी जमा करावी.
४. येथील वरील उपवाक्य २ मध्ये दिलेल्या अंडरटेकिंगमध्ये असे द्यावे की, प्रस्तावित बोलीदार लागू मर्यादाते कोडच्या कलम २९ ए खाली कोणत्याही अपात्रतेपासून त्यावर परिणाम होऊ नये.
५. प्रस्तावित बोलीदारांनी नोंद घ्यावी की, कोणत्याही टप्प्यावर ते अपात्र असल्याचे आढळल्यास, परिपत्रक क्र. आयबीबी/एलआयक्यू/८४/२०२५ दि. २८ मार्च २०२५ अन्वये जमा केलेली ईएमडी आयबीबीआय द्वारे जप्त केली जाईल.
६. कृपया नोंद घ्यावी की, संबंधित लिलावासाठी ईएमडी चा भरणा ई–वॅलेटमध्ये निधी जमा करून व पार्टिसिपेट वर क्लीक करून बंकनेट पोर्टलद्वारे करावी. पात्र बोलीदारांची नावे **www.baanknet.com** या पोर्टलवर ऑनलाईन ई–लिलाव मध्ये भाग घेण्यासाठी लिक्विडेटरद्वारा ओळखली जातील व कळवतील. इच्छुक बोलीदारांनी लिलाव पोर्टलवर त्यांचा युजर आयडी व पासवर्ड तयार करावा आणि पोर्टलच्या ई–वॅलेटमध्ये ईएमडी रक्कम जमा करावी. ई–लिलाव पोर्टलसंबंधीच्या कोणत्याही चौकशीसाठी, बांकनेट (बँक असेट ऑक्शन नेटवर्क) ईमेल आयडी **support.baanknet@psballiance.com**, मोबाईल क्र. + ९१ ८२९१२२०२२० यांना संपर्क करावा.
७. यशस्वी बोलीदारास संमत विक्रीच्या (म्हणजे स्वीकारलेली बोली रक्कम अधिक सेट ऑफ नंतर इतर लागू कर/ड्यूटीज/मिळालेली ईएमडी ॲडजस्ट करून) उर्वरित रकमेचा भरणा करण्यासाठी कमाल कालावधी एलओआय च्या तारखेपासून देय व्याजासह ९० दिवस हा आहे.
८. इच्छुक अर्जदारांनी ईएमडी जमा करणे आणि बोली प्रपत्रे सादर करण्यास आळश्यक सहाय्यासाठी **cirp.ughvintagehospital@gmail.com** या वर लिक्विडेटरला संपर्क करावा किंवा लिक्विडेटरचे अधिकृत प्रतिनिधी यांना (+९१) **९८२०५४२७११** वर संपर्क करावा.
९. हे स्पष्ट करण्यात येते की, हे आमंत्रण प्रास्तावित बोलीदारांना आमंत्रित करण्यासाठी आहे व विक्री करावयासच हवी यासाठी लिक्विडेटर वा कंपनीवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक नाही. लिक्वीडेटरलालिक्वीडेशन प्रक्रियेच्या हितसंबंधात ई–लिलावाच्या वेळापत्रकासह कोणत्याही अटी व शर्ती वाढवणे/बदलणे/रद्द करणे आणि/किंवा सुधारणे याचा अधिकार आणि लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर त्यासाठी कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही पूर्वसूचना न देता कोणतीही बोली फेटाळण्याचा अधिकार आहे.
१०. सदर ई–लिलाव **जसे आहे जेथे आहे, जे आहे जे काही आहे, तेथे जे जे काही आहे आणि कोणत्याही रिकोर्सशिवाय** या तत्वावर घेतला जाईल.

सही /–
श्री. गिरीश कृष्णा हिंगोरानी
लिक्विडेटर – मे. यूजीएच व्हिंटेज हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटर प्रायव्हेट लिमिटेड (लिक्विडेशनमधील)
आयबीबीआय नोंदणी क्र. : आयबीबीआय/आयपीए–००२/आयपी–एन००८४२/२०१९ २०२०/१२६९५
दिनांक : ०४.०७.२०२५ पत्ता : ५ सी मेहता सदन, एसएच पारेलकर मार्ग, दादर,
ठिकाण : मुंबई मुंबई, महाराष्ट्र–४०००२८

वादळी वाऱ्यामुळे तूये येथील काही घरांचे नुकसान

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. ३: तूये भोमवाडा येथील जोरदार वारा पावसामुळे काही घरांची छपरे उडून गेल्यामुळे स्थानिक लोकांना मोठ्या प्रमाणात नुकसानी झालेली आहे .याची गंभीर दखल स्थानिक आमदार जीत आरोलकर यांनी घेतली असून आपण या सर्वांना वैयक्तिक पातळीवरून सर्वतोपरी मदत करणार, शिवाय सरकारकडून मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत यांच्याकडे चर्चा करून मुख्यमंत्री निधी मधूनही त्यांना योग्य तो निधी नुकसान भरपाई मिळवून देणार असल्याची ग्वाही आमदार जीत आरोलकर यांनी दिली.

भोम वाडा तूये येथील प्रज्योत प्रकाश नाईक, सतीश सत्यवान नाईक,सुनील गंगाराम नाईक. व इतरांच्या घराची छपराची गॅरेज मोठ्या प्रमाणात नुकसानी झाल्याची घटना घडली .या घटनेची माहिती पेडणे अग्निशामंन दलाला मिळताच घटनास्थळी जवानांनी येऊन अडथळे दूर करण्याचा प्रयत्न केला.

शिवाय घटनास्थळी माजी सरपंच सुलक्षा नाईक, स्थानिक पंच स्वीटी नाईक पंच अनिल हरमलकर स्थानिक नागरिक मदत कार्याला धावून आले.

बांदा येथे पुलावरून भरधाव कार ओहोळात कोसळली

■ टीम दैनिक हेराल्ड

बांदा, दि. ३ : मुंबई–गोवा महामार्गावरील बांदा बसस्थानकाजवळ असलेल्या दुसऱ्या पुलावरून भरधाव वेगात असलेली एक कार मध्यरात्री एकच्या सुमारास ओहोळात कोसळली. या कारमध्ये चार प्रवासी होते, मात्र सुदैवाने गाडीचा सनरूफ उघडल्याने ते सर्वजण बचावले. या घटनेने परिसरात काही काळ खळबळ उडाली होती. याप्रकरणी कार चालकाविरोधात बांदा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला.

मिळालेल्या माहितीनुसार, सावंतवाडीहून गोव्याच्या दिशेने जाणारी कार बांदा बसस्थानकाजवळ आली असता चालकाचे नियंत्रण सुटले आणि कार दुभाजकावर चढली. दुभाजकावर लावण्यात आलेल्या स्ट्रीट लाईटच्या खांबाला धडक देत कार थेट पन्नासहुन अधिक खोल ओहळात कोसळली. कारमध्ये अडकलेले चारही प्रवासी भयभीत झाले होते. मात्र, गाडीचा सनरूफ उघडल्यामुळे त्यापैकी एका प्रवाशाला बाहेर येता आले. त्याने तातडीने महामार्गावरून जाणाऱ्या इतर वाहनांना मदतीसाठी विनंती केली. दरम्यान, अन्य तिघे जण गाडीच्या छतावर उभे राहून मदतीसाठी आरडाओरडा करत होते.

याचवेळी गस्तीवर असलेल्या पोलिसांना घटनेची माहिती मिळताच ते तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. तुडुंब भरलेल्या ओहोळातून प्रवाशांना बाहेर काढण्याचे आव्हान पोलिसांसमोर होते. पोलिसांनी प्रसंगावधान राखत सर्वप्रथम या चारही प्रवाशांना लाईफ जॅकेट दिले आणि त्यानंतर दोरीच्या सहाय्याने त्यांना सुखरूप बाहेर काढले. यात संकेत गुरुनाथ राऊळ (२६ सावंतवाडी), राहुल जेरोन फिलिप्स(२४, सावंतवाडी), केतन तन रवींद्रनाथ मुंज (२३, माणगाव), बाबुराव प्रविण गवस (२५, सावंतवाडी) अशी त्या चारही जणांची नावे आहेत. यातील चालक संकेत राऊळ यांच्या विरोधात भरधाव वाहन चालवील्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

पाण्यातून बाहेर काढल्यानंतर या चारही जणांना बांदा पोलीस कर्मचाऱ्यांनी उपचारासाठी बांदा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ. गजानन सारंग यांनी उपचार करून घरी पाठवून दिले.

पोलीस कर्मचारी विलास भोगले, राजाराम कापसे, रोहित कांबळे आणि दाजी परब यांनी दाखवलेल्या धाडसामुळे आणि समयसूचकतेमुळे या चारही प्रवाशांचे प्राण वाचले. त्यांच्या या अतुलनीय कार्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

गुरुवारी सकाळी अकराच्या सुमारास क्रेनच्या सहाय्याने ती कार बाहेर काढण्यात आली. यात कारचा चेंदामेंदा झाला होता. सुदैवाने कार मधील एकालाही गंभीर दुखापत झाली नाही.

अनघा वाचासुंदर प्रतिष्ठानच्या स्पर्धांचे वेळापत्रक जाहीर

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ३: अनघा वाचासुंदर प्रतिष्ठानच्या वार्षिक ११ स्पर्धांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. ६ जुलै रोजी सकाळी १० वाजता इयत्ता पहिली व दुसरीच्या मुलांसाठी बालगीत स्पर्धा तर संध्याकाळी ३ वाजता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी बोध कथा स्पर्धा घेण्यात येईल.११ जुलै रोजी इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी सकाळी ९ वाजता प्रज्ञावंत विद्यार्थी स्पर्धा तर १२ जुलै रोजी सकाळी १० वाजता इयत्ता पाचवी व सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी पौराणिक कथा स्पर्धा घेण्यात येणार आहे.१२ जुलै रोजी संध्याकाळी ३ वाजता इयत्ता सातवी व आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी नाट्यछटा स्पर्धा घेण्यात येईल.१३ जुलै रोजी सकाळी १० वाजता इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा तर संध्याकाळी तीन वाजता ११ वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी मराठी व कोकणी कविता सादरीकरण स्पर्धा होईल.१३ जुलै रोजी संध्याकाळी तीन वाजता सर्व शिक्षकांसाठीही मराठी कोकणी कविता सादरीकरण स्पर्धा घेण्यात येईल. या सर्व स्पर्धा प्रतिष्ठानच्या सभागृहात होतील.१४ रोजी दुपारी २.३० वाजता महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी व बीएड च्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्ररित्या निबंध स्पर्धा घेतल्या जातील.१५ जुलै रोजी दुपारी २.३० वाजता डीएड च्या विद्यार्थ्यांसाठी पथनाट्य स्पर्धा होईल. या स्पर्धा विद्या प्रबोधिनी हायस्कूल पर्वरी येथे घेण्यात येतील.

पर्वरी लायन्स क्लबचा ५२ वा अधिकारग्रहण सोहळा

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ३ : पर्वरी लायन्स क्लबचा ५२ वा अधिकारग्रहण सोहळा येथील प्राईम पार्क सभागृहात पार पडला. माजी प्रांतपाल ससिंद्रन नायर हे या सोहळ्याला प्रमुख पाहुणे तथा शपथग्रहण अधिकारी म्हणून उपस्थित होते. त्यांनी नूतन अध्यक्ष राजेंद्रप्रसाद एस. पटेल यांना व त्यांच्या संचालक मंडळाला अधिकाराची शपथ देविवली. मावळते अध्यक्ष डॉ. मोहन सांगोडकर यांनी स्वागतपर भाषण केले. ते म्हणाले आम्ही आमच्या कारकिर्दीत थेरा निर्वाणा हेल्थ केअर सोल्युशन्स च्या सहयोगाने ओशेल शिवोली येथे वैद्यकीय केंद्र सुरू केले व लायन्स क्लब पर्वरीच्या वैद्यकीय केंद्राच्या विस्तारित इमारतीचे दोन मजले पूर्ण केले. नायर यांनी भारतातील बरेच लायन्स क्लब खुप चांगले सामाजिक उपक्रम राबवत आहेत परंतु संकेत स्थळावर त्याची माहिती टाकण्यात कमी पडतात. लायन्स चे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष म्हणून ए. पी. सिंग या भारतीय कर्तृत्ववान व्यक्तीची निवड झाली आहे ही अभिमानाची बाब असून त्यांच्या कार्य सिद्धीसाठी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन नायर यांनी जाता जाता केले. राजेंद्रप्रसाद पटेल यांनी आपल्याला अध्यक्षपदाचा मान दिल्याबद्दल आभार मानून, क्लब प्रगतीपथावर नेण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन केले. त्यांनी आगामी उपक्रमात मधुमेह जागृती शिबिर, नेत्र तपासणी शिबिर, कर्करोग निदान मोहिम, रक्षा सुरक्षा जागृती अभियान, वृक्षारोपण आदींचा समावेश असल्याचे सांगितले. सचिव उमेश सरदेसाई यांनी सूत्रसंचालन केले. सोहळ्याला माजी प्रांतपाल व्हि.वाय.पवार व नितीन मगनलाल, लायन्सचे प्रादेशिक अध्यक्ष प्रशांत चणेकर व क्षेत्रिय अध्यक्ष व्यंकटेश बाबलादि उपस्थित होते. यावेळी पर्वरी भागातील विद्यालयातून शालांत परीक्षेत प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. चितरकुमार जिंदाल पुरस्कर्ते होते.नवीन संचालक मंडळात डॉ. मोहन सांगोडकर (भूतपूर्व अध्यक्ष), बेंटो वाझ, व्यंकटेश बाबलादि, चितरकुमार जिंदाल, नितीन मगनलाल (सल्लागार समितीचे अध्यक्ष), व्हि. वाय. पवार (सल्लागार), उमेश सरदेसाई, प्रकाश आमरे, नीलिमा बाबलादि, अंटोनियो कामिलो मोनतेरो , रिता मगनलाल, मिलविन वाझ, ज्योत्स्ना पटेल, नितीन देसाई, रमेशचंद्र गोहिल, सुनील गणपाल मैतर, द्रिबी मोनेतेरोयांचा समावेश आहे.

स्वस्तिक हॉस्पिटल व रेडकर हॉस्पिटलमध्ये साजरा केला 'डॉक्टर्स डे'

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ३ : राष्ट्रीय डॉक्टर्स डे निमित्त, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, पणजी विभागाच्या क्षेत्रीय प्रमुख श्रीमती ओलिविया परेरा आणि इतर अधिकाऱ्यांनी आज स्वस्तिक हॉस्पिटल व रेडकर हॉस्पिटल येथील मान्यवर डॉक्टरांचा पुष्पगुच्छ, प्रशस्तिपत्र आणि भेटवस्तूंनी सन्मान केला. या कार्यक्रमात डॉ. साहिल, डॉ. संदीप, डॉ. रोशनी, डॉ. सागर रेडकर आणि डॉ. सुप्रिया रेडकर यांच्यासह इतर आरोग्यसेवकांचा सुद्धा सन्मान करण्यात आला.पणजी विभागाच्या क्षेत्रीय प्रमुखांनी आपल्या भाषणात सर्व डॉक्टरांचे त्यांच्या निःस्वार्थ सेवा व समर्पणासाठी आभार मानले आणि कोविड–१९ काळापासून आजपर्यंत डॉक्टरांनी बजावलेल्या भूमिकेला वंदन केले.स्वस्तिक हॉस्पिटलचे डॉ. साहिल यांनी या कार्यक्रमासाठी बँकेचे आभार मानले आणि सांगितले की, अशा उपक्रमांमुळे डॉक्टरांना अधिक प्रेरणा मिळते आणि बँकेकडून मिळालेला सन्मान अत्यंत कौतुकास्पद आहे.या कार्यक्रमात बँक अधिकारी श्री. नीरज कुमार यांनी बँकेच्या विविध योजना जसे की – सेंट संजीवनी, सेंट सॅलरी, सेंट क्लीन, सेंट होम व सेंट व्हेईकल याबद्दल माहिती दिली.

डिचोली तालुक्यात मुसळधार पाऊस बरसला

अनेक ठिकाणी पडझड आमोणा येथे दोन घरांची हानी | डिचोली वाळवंटी नदी पातळीत वाढ

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. ३ : गेले काही दिवस ऊन पावसाचा खेळ चालू असतानाच मंगळवारपासून डिचोली तालुक्यात पावसाने मुसळधार बरसात सुरू केली असून बुधवारी संपूर्ण दिवस मुसळधार पावसाने झोडपल्याने आठवडी बाजारावर परिणाम झाला तसेच जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले. अनेक ठिकाणी सखल भागात पाणी साचल्याने लोकांची तारांबळ उडाली.

डिचोली तालुक्यात बुधवारी सुमारे दोन इंच पावसाची नोंद झाल्याची माहिती जलसंपदा खाते तर्फे देण्यात आली आतापर्यंत व तालुक्यात १३२० एम एम पावसाची नोंद झाल्याची माहिती देण्यात आली

आमोणा येथे दोन ठिकाणी घरावर वृक्ष कोसळून नुकसान झाल्याची माहिती अग्निशामक दला तर्फे देण्यात आली तसेच तालुक्यात विविध ठिकाणी झाडांची पडझड झाल्याने नुकसान झाल्याचे सांगण्यात आले

अग्निशामक जवान मदत कार्यात गुंतलेले आहेत

दरम्यान अंजुने धरण परिसरात बुधवारी १२४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून आतापर्यंत ११४८ पाऊस झाल्याचे सांगण्यात आले. धरणाची पातळी सुमारे ८० मीटर च्या आसपास भरल्याचे सांगण्यात आले

दरम्यान तिळारी धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू झाला असून नदी पातळी वाढ झाल्याने गावातील लोकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आल्याची माहिती त धरण अधिकाऱ्याने दिली.

धरणाच्या परिसरात झालेल्या पावसामुळे नियोजित पाणी पातळी १०६.७० ही बुधवारी पूर्ण होऊन अतिरिक्त पाणी उच्च कालवा खळग्यातील धरणातून तिळारी नदीपात्रात दाखल झाले

डिचोली तालुक्यात अनेक सकल भागात पाणी शिरल्याने लोकांची गैरसोय झालेली आहे काही ठिकाणी गटारांचा व्यवस्थित निचरा होत नसल्याने पाणी साचून राहण्याच्या घटना घडत आहेत तर काही ठिकाणी रस्त्याला खड्डे पडल्याने लोकांना त्रास सहन करावा लागला आहे जलसंपदा खात्याचे मुख्य अभियंता ज्ञानेश्वर साले लकर यांच्या मार्गदर्शनाखाली धरण परिसरात तसेच डि चोली व साखळी नदी परिसरात जलसंपदा खात्याचे अधिकारी विशेष लक्ष ठेवून आहेत.

पावसाचा जोर वाढल्याने डिचोली तसेच वाळवंटी नदीच्या पातळीत वाढ झालेली आहे मात्र ती पूर्णपणे नियंत्रणात सांगण्यात आले.

मंगळवारपासून खऱ्या अर्थाने मुसळधार पावसाला सुरुवात झाल्याने वातावरणात पूर्णपणे गारवा निर्माण झालेला आहे. डिचोलीचे आमदार डॉ. चंद्रकांत शेटये मयेचे आमदार प्रेमेंद्र शेट यांनी आपत्कालीन नियंत्रणाशी संपर्क ठेवला असून सर्व प्रकारच्या आवश्यक उपाययोजना करण्याबाबत चर्चा केल्याचे सांगण्यात आले.

मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत यांनी बुधवारी सायंकाळी पावसाच्या पडझडीचा आढावा घेत असतानाच आपत्कालीन नियंत्रण कक्षाला सजग राहण्याचे आदेश दिले आहे.

कोणत्याही परिस्थितीत लोकांना त्रास होणार नाही याची खबरदारी घ्या अशा सूचना त्यांनी उपजिल्हाधिकारी जिल्हाधिकारी व स्थानिक प्रशासनांना केले आहे.

NOTICE

My Husband **Late Shivaji Shetgaonkar** was owning **Maruti Alto LX U3 New Car** bearing **Reg. No. GA-01-E-5603.** After his death, I have applied to transfer the ownership into my name. Any member of the public, or any other Institution/ Bank objecting for such transfer, may send their objections along with documentary proof, to the **RTO, Vasco** or to me **within 15 days** time from today.

Date: 03.07.2025 Sd/-
Smt.Sujata Shivaji Shetgaonkar
F. No. S-5, Ekta Residency, Opp. Goa Shipyard Ltd., Vaddem, Vasco-Da-Gama, South Goa 403802.
Sandeep Ads